जा. क्र. ६४७०/१६

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२० 14 DEC 2016

**परिपत्रक क्र.** ४८७ **दिनांक** १४/१२/२०१६

सर्व विश्वस्तांना विनंती करण्यात येते की, त्यांनी धर्मादाय संघटनेतील कार्यालयात कलम २२ प्रमाणे बदल अर्ज दाखल करताना ज्या विश्वस्तांचे नांव परिशिष्ट-१ वरुन कमी करावयाचे आहे त्या विश्वस्तांनी संबंधित न्यास किंवा संस्थेमध्ये कधीपासून काम केले त्याची तारीख तसेच त्याचे नांव कमी करण्यासाठी घेण्यात आलेल्या ठरावाची तारीख / ज्या तारखेला राजिनामा दिला ती तारीख नमुद करणे आवश्यक आहे. म्हणजेच एका विश्वस्ताने त्याची नेमणुक झाल्यापासून ते त्याचे नांव कमी करेपर्यन्त किती कालावधीसाठी काम केले तो संपुर्ण कालावधी (पदावर नेमणूक केल्याची तारीख व पदावरुन कमी केल्याची तारीख) नमूद करणे आवश्यक आहे. बदल जर निवडणुकीनुसार घडून आला असल्यास पूर्वीच्या मॅनेजिंग कमिटीने किती वर्ष काम केले तो कालावधी तसेच नविन निवडून आलेली मॅनेजिंग कमिटी किती वर्षासाठी निवडून आलेली आहे तो कालावधी नमुद करणे आवश्यक आहे.

अभिलेखा शाखेत काम करणा-या कर्मचा-यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी परिशिष्ट-१ मध्ये नोंदी घेताना ज्या विश्वस्ताचे नांव कमी करावयाचे आहे त्यासंबंधीची नोंद घेताना संबंधित विश्वस्तांना कोणत्या तारखेपासून कमी केले आहे ती तारीख तसेच त्या विश्वस्ताने ज्या कालावधीत काम केलेले आहे त्या संपुर्ण कालावधीची नोंद परिशिष्ट-१ मध्ये घ्यावी. बदल अर्ज जर निवडणुकीनुसार असेल तर जुन्या व नव्या अशा दोनही मॅनेजिंग कमिटीच्या कालावधीची नोंद परिशिष्ट- १ मध्ये घेण्यात यावी.

सदर तारीख ही संबंधित फेरफार अर्जात नमुद नसेल तर संबंधित कागदपत्रात ह्या तारखेचा शोध घेण्यात यावा व परिशिष्ट-१ मध्ये नोंद घेण्यात यावी. तसे नसल्यास व फेरफार अर्ज मंजुर झालेला असल्यास त्या फेरफार अर्जाची असेल तशी नोंद परिशिष्ट-१ मध्ये घेणे आवश्यक आहे.

Sawale

(श.भा.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

प्रत :

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४. अभिलेखा शाखा, मुख्यालय / बृहन्मुंबई
५. नोटीस बोर्ड   ६. कार्यालयीन नोंदवही

D:\SWATI\Circulars\Circular - Marathi.docx